ePaper

महामहिम द्रौपदी मुर्मू पहिल्या आदिवासी महिला राष्ट्रपतीपदी विराजमान

वर्ष - 6 । अंक - 111 | UDYAM-MH-26-0158827

महाईन्यूज™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

आतील पानांत

- धरणक्षेत्रांत तुरळक पावसाची हजेरी
- रिक्षा प्रवासही महागला!
- मंत्रीमंडळ विस्तारावरून अजित पवारांची शिंदे-फडणवीस सरकारवर टीका

www. mahaenews.com । मंगळवार । दिनांक 26 जुलै 2022 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

"त्यांना ताकद दिली ही माझी चूक आहे. त्यात ताकदीने त्यांनी उलटा वार केला. राजकारणात जन्म दिलेल्या आईला गिळायला निघालेली ही औलाद आहे. पण तेवढी ताकद त्यांच्यात नाही, कारण आई ही आईच असते. अगोदर जागा ५० टक्के आणि सत्तेचा वाटा ५० टक्के असं ठरलं होतं. पण आपल्याला जागा कमी दिल्या. जागा दिल्या तिकडे बंडखोरी केली गेली. अनेक जागा पाडल्या गेल्या. त्यानंतर असं काही ठरलेलंच नव्हतं असं सांगितलं गेलं. मग अता कसे झाले.

उद्धव ठाकरे, शिवसेना अध्यक्ष

आम्ही पुढच्या निवडणुकीमध्ये युती म्हणूनच लोकांच्या समोर जाणार आहोत. मतदान तोंडावर आलं आहे. त्यामुळे आमची युती पसंत आहे की तुमची आघाडी पसंत आहे, याचा निर्णय लोकं घेतील. जनतेला सामोरं जाण्याची आमची तयारी आहे. निवडणूक आयोग आम्हाला जे काही चिन्ह देईल, ते घेऊन आम्ही युती म्हणून लोकांच्या समोर जाणार आहोत.

-दीपक केसरकर

निगडीत निष्ठावंत शिवसैनिकांचा मेळावा

बंडखोरांना शिवसेनेचे दरवाजे बंद!

सचिन आहीर यांची टीका

पिंपरी ।
। महाईन्यूज । प्रतिनिधी।

राज्यात काय चाललंय हे जनता बघत आहे. कोण कोणाला चिठ्ठ्या देतयं, कोण माईक ओढून घेतंय हे सर्व जनतेला दिसत आहे. शिवसेनेत बंडखोरी करणा-यांना आगामी निवडणुकीत जनता उत्तर देईल. तेव्हा हेच आमदार, खासदार शिवसेनेकडे परततील. पण, त्यावेळी शिवसेनेचे दरवाजे बंद असतील, असा इशारा शिवसेनेचे पुणे जिल्हा संपर्कप्रमुख, आमदार सचिन अहिर यांनी यांनी दिला.

निगडीमध्ये झालेल्या निष्ठावंत शिवसेनेच्या मेळाव्यात ते बोलत होते. विधान परिषदेच्या उपसभापती निलम गोऱ्हे, सह संपर्कप्रमुख आदित्य शिरोडकर, शहरप्रमुख ॲड. सचिन भोसले, उपजिल्हाप्रमुख निलेश मुटके, शिरूरच्या महिला संघटिका सुलभा उबाळे, कामगार नेते इरफान सय्यद, महापालिकेतील माजी गटनेते राहुल कलाटे, चिंचवड विधानसभा प्रमुख अनंत कोऱ्हाळे, भोसरी विधानसभा प्रमुख धनंजय आल्हाट, आशा भालेकर, भाविक देशमुख, तुषार नवले, पांडुरंग पाटील, अमोल निकम, अनिल सोमवंशी, रोमी संधू आदी पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

शिंदे गटात गेलेल्या खासदार बारणे यांच्याबाबत आमदार अहिर म्हणाले, शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी काँग्रेसमधून आलेल्या श्रीरंग बारणे यांना मानसन्मान दिला. खासदारकी दिली. मोदी लाटेत कोणालाही ही उमेदवारी दिली असती. पण, ती बारणे यांनाच दिली. ठाकरे यांना सर्व सोडून जातायेत अशा वेळी त्यांनी सोबत राहायला हवे होते. बारणे यांनी स्वतःची खासदारकी वाचवण्यासाठी शिंदे गटात प्रवेश केला आहे. मावळ मतदारसंघ

राष्ट्रवादीला देण्यास आम्ही स्पष्ट विरोध केला होता. ती सीट आमची आहे, असे म्हटले होते, असेही ते म्हणाले.

भाजपातर्फे पोलीस आयुक्तांना राष्ट्रपतींची प्रतिमा भेट

शहराध्यक्ष व आमदार महेश लांडगे यांची उपस्थिती

। पिंपरी । महाईन्यूज ।

देशाच्या इतिहासात पहिल्या महिला आदिवासी राष्ट्रपती म्हणून श्रीमती द्रौपदी मुर्मू यांनी आज शपथ घेतली. ही बाब देशातील वंचित, शोषित आणि आर्थिकदृष्ट्या दुर्लक्षीत घटकांसाठी आनंदाची बाब आहे, अशा भावना भाजपा शहराध्यक्ष व आमदार महेश लांडगे यांनी व्यक्त केल्या. पिंपरी-चिंचवड भारतीय जनता पार्टीच्या वतीने श्रीमती द्रौपदी मुर्मू यांनी

राष्ट्रपतीपदाची शपथ घेतल्याच्या निमित्ताने पिंपरी-चिंचवड पोलिस आयुक्त अंकूश शिंदे आणि महापालिका आयुक्त तथा प्रशासक राजेश पाटील यांना महामहीम राष्ट्रपती श्रीमती द्रौपदी मूर्म यांची प्रतिमा कार्यालयात लावण्यासाठी भेट दिली.

यावेळी शहराच्या प्रथम नागरिक माजी महापौर उषा उर्फ माई ढोरे, माजी महापौर नितीन काळजे, राहुल जाधव, माजी सत्तारुढ पक्षनेते नामदेव ढाके, माजी उपमहापौर केशव घोळवे, प्रदेश सचिव अमित गोरखे, संघटन सरचिटणीस अमोल थोरात, सरचिटणीस विजय फुगे, मोरेश्वर शेडगे, माजी नगरसेविका सुजाता पालांडे, झामाताई बारणे, अनुराधा गोरखे, अश्विनी चिंचवडे, आरती चोंधे, सोनाली गव्हाणे, अनुराधा गोरखे, सारिका लांडगे, शर्मिला बाबर, माधवी राजापुरे, शारदा सोनवणे, उषा मुंडे, निर्मला कुटे, युवा मोर्चा शहराध्यक्ष श्री. संकेत चोंधे विनोद मालू,धनंजय शाळीग्राम, विजय शिनकर, आबा मोरे यांच्यासह पदाधिकारी व सहकारी उपस्थित होते.

धरणक्षेत्रांत तुरळक पावसाची हजेरी!

धरणसाठा 72 टक्क्यांवर

। पुणे। महाईन्यूज ।

खडकवासला धरणसाखळी प्रकल्पातील महत्त्वाचे असलेले पानशेत धरण ७५ टक्के भरले आहे. इतर तिन्ही धरणांमध्येही समाधानकारक पाणीसाठा जमा होत आहे. चारही धरणांच्या परिसरात सोमवारी दिवसभरात तुरळक पावसाने हजेरी लावली. सध्या चारही धरणांमधील पाणीसाठा ७२ टक्क्यांवर पोहोचला आहे.

शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या टेमघर, वरसगाव, पानशेत आणि खडकवासला धरणांच्या पाणलोट क्षेत्रात गेल्या आठवड्यापासून पाऊस ओसरला आहे. मात्र, पावसाने विश्रांती घेतलेली नाही. तुरळक पाऊस दररोज हजेरी लावत आहे. त्यामुळे धरणांच्या पाणलोट क्षेत्रात पाणी येण्याचे प्रमाण कमी-अधिक प्रमाणात सुरूच आहे.

सध्या पानशेत धरण ७५ टक्के, वरसगाव धरण ७० टक्के, टेमघर धरण ६० टक्के भरले असून खडकवासला हे धरण यापूर्वीच पूर्ण क्षमतेने भरलेले आहे. चारही धरणांमध्ये २१.०३ अब्ज घनफूट (टीएमसी) पाणीसाठा जमा झाला आहे. गेल्या वर्षी चारही धरणांत २५ जुलैपर्यंत २१.३६ टीएमसी म्हणजेच ७३.२८ टक्के पाणीसाठा जमा झाला होता. गेल्या वर्षीच्या तुलनेत यंदा केवळ ०.३३ टीएमसीने पाणीसाठा कमी आहे. दिवसभरात टेमघर धरणक्षेत्रात १३ मिलिमीटर, वरसगाव आणि पानशेत धरणांच्या परिसरात अनुक्रमे तीन मि.मी. आणि दोन मि.मी., तर खडकवासला धरणक्षेत्रात अवघ्या एक मि.मी. पावसाची नोंद करण्यात आली. धरणांच्या परिसरात पावसाचे प्रमाण कमी झाले असल्याने सध्या खडकवासला धरणातून मुठा नदीत पाण्याचा विसर्ग थांबविण्यात आला आहे, असे जलसंपदा विभागाकडून सांगण्यात आले.

दरम्यान, पिंपरी-चिंचवड शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या पवना धरण परिसरात दिवसभरात २७ मि.मी. पाऊस पडला. या धरणात सध्या ६.६९ टीएमसी म्हणजेच ७८.६१ टक्के पाणीसाठा जमा झाला आहे. जिल्ह्यातील इतर धरणांपैकी येडगाव, कळमोडी, चासकमान ही धरणे १०० टक्के भरलेली आहेत, तर भामा आसखेड, वडीवळे, वीर ही धरणे १०० टक्के भरण्याच्या मार्गावर आहेत. जिल्ह्याच्या सीमेवरील उजनी धरणात ३५.७५ टीएमसी म्हणजेच ६६.७४ टक्के पाणीसाठा जमा झाला असल्याचे जलसंपदा विभागाकडून सांगण्यात आले.

प्रमुख धरणांमधील पाणीसाठा टीएमसी, कंसात टक्क्यांत

टेमघर २.२० (५९.२८), वरसगाव ८.९६ (६९.९३), पानशेत ८.०७ (७५.७६), खडकवासला १.८० (९१.०६), भामा आसखेड ६.९८ (९१), पवना ६.६९ (७८.६१), गुंजवणी ३.०८ (८३.३८), निरा देवघर ७.४१ (६३.१७), भाटघर १६.४१ (६९.८२), वीर ९.२० (९७.८५) आणि उजनी ३५.७५ (६६.७४)

शॉर्ट न्यूज »

तलावात बुडून तलाठ्याचा मृत्यू

। पुणे। महाईन्यूज ।

पाझर तलावात बुडून तलाठी तरुणाचा मृत्यू झाल्याची घटना सोमवारी घडली. भोर तालुक्यातील वरवे खुर्द गावात ही घटना घडली. मुकुंद त्रिबंकराव चिरके (वय ३५, सध्या रा. नसरापूर, ता. भोर, जि. पुणे, मूळ रा. जहागीरमोहा, ता. माजलगाव, जि. बीड) असे मृत्युमुखी पडलेल्या तलाठ्याचे नाव आहे. मुकुंद चिरके मित्रांबरोबर दररोज सकाळी फिरायला जायचे. सोमवारी सकाळी मुकुंद आणि त्यांचे तीन मित्र नेहमीप्रमाणे फिरायला बाहेर पडले. सकाळी सातच्या सुमारास वरवे खुर्द गावातील लघुपाटबंधारे विभागाच्या पाझर तलावात ते पोहण्यासाठी उतरले. त्या वेळी पोहताना त्यांची दमछाक झाली आणि ते पाण्यात बुडाले. काठावर थांबलेल्या मित्रांच्या लक्षात हा प्रकार आला.

आंबेगावमधील पाच गावांचे खासगी जागेत पुनर्वसन

राज्य सरकारची मान्यता; दरडप्रवण गावांचे खासगी जागांवर पुनर्वसन केले जाणार

पुणे । महाईन्यूज प्रतिनिधी।

जिल्ह्यातील धोकादायक असलेल्या २३ गावांपैकी आंबेगाव तालुक्यातील पाच दरडप्रवण गावांचे खासगी जागांवर पुनर्वसन केले जाणार आहे. याबाबतच्या प्रस्ताव जिल्हाधिकारी कार्यालयाने राज्य सरकारला पाठविला होता. त्याला मंजुरी मिळाली आहे. त्याकरिता करण्यात येणारे भूसंपादन लवकरच सुरू केले जाणार आहे.

आंबेगाव तालुक्यातील माळीण या गावात ३० जुलै २०१४ रोजी दरड कोसळून १५१ जणांचा मृत्यू होण्याची दुर्घटना घडली होती. त्यानंतर जिल्हा प्रशासनाने जिल्ह्यातील धोकादायक गावांचे सर्वेक्षण केले होते. डोंगर उतारावरील गावे आणि वाड्या यांचे सर्वेक्षण केल्यावर ९५ ठिकाणे ही धोकायदायक असल्याचे निदर्शनास आले होते. त्यानंतर या ठिकाणांची भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा (जीएसडीए) या विभागाकडून पाहणी करण्यात आली. त्यानुसार २३ गावांमध्ये दरडी कोसळण्याचा धोका असल्याचा निष्कर्ष काढण्यात आला होता. शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयाने (सीओईपी) धोकादायक असलेल्या गावांमध्ये सुरक्षेचे उपाय सुचविले. त्यानुसार या गावांमध्ये विविध कामे करण्यात येत आहेत. मात्र, २३ गावांपैकी आंबेगाव तालुक्यातील फुलवडेअंतर्गत भगतवाडी, माळीणअंतर्गत पसारवाडी, आसणे, जांभोरीअंतर्गत काळेवाडी क्रमांक एक आणि दोन, बेंडारवाडी ही पाच गावे माळीणपासून जवळच आहेत. या गावांमध्ये सुरक्षिततेबाबतीतील कामे करण्यात आली, तरी धोका कायमचा टळणार नसल्याने या गावांतील नागरिकांकडून पुनर्वसनाची मागणी करण्यात येत होती. त्यानुसार जिल्हा प्रशासनाने या गावांचे खासगी जागांवर पुनर्वसन करण्याचा प्रस्ताव राज्य सरकारकडे पाठविला होता. राज्य सरकारने या गावांच्या पुनर्वसनाच्या प्रस्तावाला मंजुरी दिली आहे.

याबाबत जिल्हाधिकारी डॉ. राजेश देशमुख म्हणाले, 'आंबेगाव तालुक्यातील धोकादायक गावांचे खासगी जागांवर पुनर्वसन केले जाणार आहे. त्यासाठी आवश्यक ती भूसंपादनाची प्रक्रिया केली जाणार आहे. भोर तालुक्यातील धोकादायक गावांच्या पुनर्वसनाचाही प्रस्ताव राज्य सरकारकडे देण्यात आला आहे.'

दरम्यान, आंबेगाव तालुक्यातील पाच गावे, भोर तालुक्यातील चार, मावळ तालुक्यातील आठ गावे, खेड, वेल्हे तालुक्यातील प्रत्येकी दोन गावे, मुळशी आणि जुन्नर तालुक्यातील प्रत्येकी एका गावाचा समावेश आहे. वेल्हे तालुक्यातील घोल आणि मावळ तालुक्यातील भुशी या गावामध्ये संरक्षणात्मक कामे करण्याची गरज नसल्याचा अहवाल सार्वजनिक बांधकाम विभागाने दिला आहे.

दरड कोसळण्याची शक्यता असलेल्या २३ गावांवर जिल्हा प्रशासन आणि जिल्हा आपत्ती व्यवस्थापन विभागाने जागता पहारा ठेवला आहे. या गावांमध्ये तलाठी, ग्रामसेवक आणि कोतवाल यांनी दररोज भेटी देऊन दर दोन तासांनी सद्यस्थितीचा आढावा घेण्यात येत आहे.

> **आंबेगाव तालुक्यातील धोकादायक गावांचे खासगी जागांवर पुनर्वसन करण्याचा प्रस्ताव राज्य सरकारने मंजूर केला आहे. लवकरच भूसंपादनाची प्रक्रिया सुरू केली जाणार आहे.**
>
> **– डॉ. राजेश देशमुख, जिल्हाधिकारी**

जिल्ह्यातील धोकादायक गावे

आंबेगाव – फुलवडे अंतर्गत भगतवाडी, माळीण अंतर्गत परसवाडी, आसाणे, जांभोरी अंतर्गत काळेवाडी, बेंडारवाडी
मावळ – लोहगड, ताजे, बोरज, तुंग-भैरवनाथ मंदिर परिसर, माळवाडी, गबाळे वस्ती, मोरमाची वाडी, भुशी
खेड – भोरगिरी पदर वस्ती, भोमाळे
भोर – जांभूळवाडी, पांगारी सोनारवाडी, धानवली खालची
मुळशी – घुटके वेल्हा – आंबवणे, घोल
जुन्नर – निमगिरी अंतर्गत तळमाची

1 ऑगस्टपासून होणार अंमलबजावणी

आता रिक्षा प्रवासही महागला!

परिवहन अधिकारी डॉ. अजित शिंदे यांची माहिती

पिंपरी।
। महाईन्यूज । प्रतिनिधी।

पुणे जिल्ह्यातील तीन आसनी ऑटोरिक्षांसाठी येत्या 1 ऑगस्टपासून पहिल्या दीड किमी अंतरासाठी किमान देय असलेल्या सध्याच्या 21 रूपये भाडेदरात सुधारणा करून सुधारित भाडेदर 23 रूपये करण्यात आले आहे. त्यापुढील प्रत्येक किमीसाठी देय भाडे 14 रूपयावरून 15 रूपये करण्यात आले आहे, अशी माहिती माहिती प्रादेशिक परिवहन प्राधिकरणाचे सदस्य सचिव तथा प्रादेशिक परिवहन अधिकारी डॉ. अजित शिंदे यांनी दिली.

विविध रिक्षा संघटनांनी वाढलेल्या इंधनदराच्या पार्श्वभूमीवर भाडेवाढीची मागणी केली होती. या पार्श्वभूमीवर तसेच खटुआ समितीच्या शिफारशीला अनुसरून ऑटोरिक्षा भाडेसुधारणा करण्याचा निर्णय जिल्हाधिकारी डॉ.राजेश देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत घेण्यात आला.

सुधारित केलेल्या भाडेदरावर पुणे व पिंपरी-चिंचवड महानगरपालिका क्षेत्रासाठी रात्री 12 ते सकाळी 5 या कालावधीसाठी 25 टक्के अतिरिक्त भाडेदर असणार आहे. महानगरपालिका क्षेत्र वगळून इतर ग्रामीण भागाकरिता रात्री 12 ते सकाळी 5 या कालावधीसाठी 40 टक्के अतिरिक्त भाडेदर राहणार आहे.

प्रवाशांसमवेतच्या सामानासाठी 60 X 40 सेमी आकाराच्या किंवा त्यापेक्षा मोठ्या नगासाठी 3 रूपये इतके शुल्क राहणार आहे. ऑटोरिक्षाचे मीटर पुन:प्रमाणीकरणासाठी (मीटर कॅलीब्रेशन) 1 ऑगस्टपासून 30 सप्टेंबरपर्यंत मुदत देण्यात आली आहे. जे ऑटोरिक्षा चालक 1 ऑगस्टपासून मीटर पुनः प्रामाणिकरण करून घेतील. त्याच ऑटोरिक्षाधारकांसाठी भाडे सुधारणा लागू राहणार आहे.

> **मुदतीत मीटर कॅलीब्रेशन करून न घेणाऱ्या ऑटोरिक्षाधारकांवर कारवाई करण्यात येणार आहे. मुदतीत मीटर कॅलीब्रेशन न केल्यास मुदत समाप्तीनंतर विलंबासाठी किमान 7 दिवस व त्यापेक्षा अधिक प्रत्येक एक दिवसासाठी 1 दिवस आणि एकूण कमाल निलंबन कालावधी 40 दिवस राहणार आहे. निलंबनाऐवजी तडजोड शुल्काचा विकल्प घेतल्यास मुदत समाप्तीनंतरच्या प्रत्येक दिवसासाठी 50 रूपये मात्र किमान 500 रूपये आणि कमाल तडजोड शुल्क 2 हजार रूपयांपर्यंत असेल.**
>
> **- डॉ. अजित शिंदे, प्रादेशिक परिवहन अधिकारी.**

राष्ट्रीय पुरस्कार विजेती आकांक्षा पिंगळे हिचा सत्कार

आयुक्त राजेश पाटील यांच्याकडून कौतुकाची थाप

> **मला पुरस्कार घोषित झाल्यामुळे शुभेच्छांचा वर्षाव होत आहे. पिंपरी चिंचवड महापालिकेने माझा सन्मान केल्यामुळे मी भारावून गेले आहे. शहराचे प्रेम आणि आशिर्वाद मला असेच कायम मिळत रहावे.**
>
> **- आकांक्षा पिंगळे, बालकलाकार.**

पिंपरी।
। महाईन्यूज । प्रतिनिधी।

या वर्षीच्या राष्ट्रीय चित्रपट पुरस्कारामध्ये 'सुमी' हा सर्वोत्कृष्ट बालचित्रपट (मराठी) ठरला. या चित्रपटातील 'सुमी' ची मुख्य भूमिका पिंपरी चिंचवड शहराची कन्या आकांक्षा लक्ष्मण पिंगळे हिने साकारली होती. या भूमिकेसाठी तिला सर्वोत्कृष्ट राष्ट्रीय बालकलाकार हा पुरस्कार घोषित झाला. ही बातमी आपल्या शहराच्या नावलौकिकात भर घालणारी तर आहेच शिवाय या शहराचा सांस्कृतिक वारसा अधिक समृध्द करणारी ही घटना आहे. 'शहरवासियांना तुझा सार्थ अभिमान आहे. असेच यश संपादन करुन आई-वडील आणि आपल्या शहराचे नाव रोशन कर' अशा शब्दांत आयुक्त तथा प्रशासक राजेश पाटील यांनी बालकलाकार आकांक्षाचे कौतुक केले.

> आकांक्षाने राष्ट्रीय चित्रपट पुरस्कारामध्ये सर्वोत्कृष्ट राष्ट्रीय बालकलाकार हा पुरस्कार पटकावून रजतकमळ मिळवले, त्याबद्दल तिचा आयुक्त तथा प्रशासक राजेश पाटील यांच्या हस्ते आज अभिनंदनपर सत्कार करण्यात आला. त्यावेळी आयुक्त पाटील बोलत होते.

आकांक्षाने राष्ट्रीय चित्रपट पुरस्कारामध्ये सर्वोत्कृष्ट राष्ट्रीय बालकलाकार हा पुरस्कार पटकावून रजतकमळ मिळवले, त्याबद्दल तिचा आयुक्त तथा प्रशासक राजेश पाटील यांच्या हस्ते आज अभिनंदनपर सत्कार करण्यात आला.

त्यावेळी आयुक्त पाटील बोलत होते. महापालिकेच्या पिंपरी येथील मुख्य प्रशासकीय भवनामध्ये झालेल्या या सत्कार प्रसंगी माजी महापौर योगेश बहल, अतिरिक्त आयुक्त विकास ढाकणे, उप आयुक्त रविकिरण घोडके, आकांक्षाचे आई वडील सुजाता व लक्ष्मण पिंगळे यांच्यासह तिचे नातेवाईक उपस्थित होते.

संपादकीय »

राकट देशा... दगडांच्या देशा...

मंगल देशा, पवित्र देशा, महाराष्ट्र देशा
प्रणाम घ्यावा माझा हा श्रीमहाराष्ट्र देशा
राकट देशा, कणखर देशा, दगडांच्या देशा
नाजूक देशा, कोमल देशा, फुलांच्याही देशा

महाराष्ट्राचा महिमा गाणारे हे राम गणेश गडकरी ऊर्फ गोविंदाग्रज यांचे काव्य आज महाराष्ट्राची एकूणच राजकीय परिस्थिती पाहिली की प्रकर्षाने आठवल्याशिवाय राहत नाही. सध्या महाराष्ट्रात राजकीय सत्तापिपासेने परिसीमा गाठलेली आहे. महाराष्ट्राच्या सर्वंकष प्रगतीपेक्षा पक्षीय राजकारण आणि पदे मिळवण्याच्या ईर्षेने राजकीय नेत्यांना असे काही पछाडले आहे की कवी, लेखक, विचारवंत यांनी जो महाराष्ट्राचा मोठेपणा आपल्या लेखनीतून शद्बबद्ध केला आहे, त्याचा सद्यस्थितीत त्यांना पार विसर पडलेला दिसतो. महाराष्ट्र हा खरेतर इतर राज्यांसाठी सगळ्याच बाबतीत आदर्श राहिलेला आहे. बहुतांश सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय परिवर्तनाच्या विचारांचे प्रणेते हे महाराष्ट्रातीलच आहेत. अनेक सुधारणावादी चळवळींचा उगम महाराष्ट्रात झाला आणि पुढे त्यांचे अनुकरण इतर राज्यांनी केले. या सगळ्या इतिहासाचा आपल्याला विसर पडलेला आहे याची जाणीव महाराष्ट्रातील राजकीय नेत्यांना राहिलेली नाही असेच एकूणच परिस्थितीचे अवलोकन केल्यावर नाईलाजाने म्हणावे लागते. आज विरोधी बाकावर बसण्याचा संयम कुणामध्येही दिसत नाही. प्रत्येकाला सत्ताधारी बाकांवर बसायचे आहे. त्यात पुन्हा सत्तेवर आल्यानंतर स्वत:साठी मंत्रीपदे मिळवायची आहेत.

केंद्रात भाजपची बहुमतातील सत्ता येऊन नरेंद्र मोदी पंतप्रधान झाल्यावर आता अल्पावधीत सगळ्या राज्यांमध्ये आपलीच सत्ता आली पाहिजे, असे भाजपच्या नेत्यांना वाटू लागले आहे. महाराष्ट्रात २०१९ साली झालेल्या विधानसभा निवडणुकीनंतर हातातोंडाशी आलेली सत्ता गेल्यानंतर केंद्र आणि राज्यातील भाजपचे नेते शिवसेनेच्या विरोधात असे काही सुडाने पेटून उठले की काहीही करून राज्यातील सत्ता मिळवायचीच असा चंग त्यांनी बांधला. त्यासाठी गेल्या अडीच वर्षांत त्यांनी काय काय केले ते लोकांना माहीत आहे. खरेतर भाजपच्या नेत्यांनी कुठल्याही उचापत्या न करता ते शांत राहिले असते तर शिवसेना, काँग्रेस आणि राष्ट्रवादी या तीन पक्षांच्या महाविकास आघाडीचे सरकार आपोआप कोसळले असते, पण तितकी उसंत बाळगण्याची भाजपच्या नेत्यांची मानसिकताच नव्हती. काहीही करून महाविकास आघाडी सरकार पडायला हवे, असाच त्यांचा पवित्रा राहिला. शेवटी अडीच वर्षांनंतर भाजपला शिवसेनेतील असंतुष्टांना बळ देण्यात यश आले आणि एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली ४० आमदारांचा वेगळा गट भाजपच्या हाती लागला.

आनंदी सकाळ

अनन्य शरणागताला शीघ्र कृपासंतोष

भागवत धर्माचे आधारस्तंभ असलेल्या नाथांच्या घराण्यात दत्तभक्ती होती. श्रीजनार्दन स्वामींनी एकनाथांच्या बालवयातच, प्रामाणिक सेवाभावावर प्रसन्न होऊन, दत्तात्रेयांचे तीन शिरे, सहा हात असे सगुण दर्शन घडविले. दत्तात्रेयांच्या सगुण रूपाकडे पाहून, या संप्रदायाला सगुण म्हणावे, की त्रिगुणात्मक त्रैमूर्ती दत्ताला निर्गुण म्हणावे? सत्व-रज-तम, उत्पत्ती-स्थिती-लय याला कारक असलेल्या ब्रह्मा, विष्णू, महेश या तिन्ही देवता दत्तावतारात एकरूप आहेत. या तीन देवता कार्यरूपाने सगुण आहेत व आश्चर्य असे, की दत्तरूपात हे त्रिगुण एकत्रित आहेत. ती त्रिगुणांची साम्यावस्था आहे, म्हणजे, जगताचे अस्तित्व नसलेली गुणातीत स्थिती. असा हा सगुण-निर्गुणाचा एकाच वेळी, एकाच रूपात दर्शन घडविणारा, स्मर्तुगामी दत्त सगुण-निर्गुणाचे मोठे विलक्षण रूप आहे. संत एकनाथ म्हणतात, 'नेति नेति शब्द न ये अनुमाना।' कार्य व कारण या शब्दांनीही दत्तात्रेयांचे अनुमान करता येत नाही.

आदिवासी, महिला म्हणून नव्हे, राष्ट्रपती म्हणून!

'जोहार, द्रोपदी मुर्मू!' हे भारताच्या नवनिर्वाचित राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांचा यथोचित गौरव करणारे व त्यांच्याकडून रास्त अपेक्षा व्यक्त करणारे विशेष संपादकीय

जोहार, द्रोपदी मुर्मू!' हे भारताच्या नवनिर्वाचित राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांचा यथोचित गौरव करणारे व त्यांच्याकडून रास्त अपेक्षा व्यक्त करणारे विशेष संपादकीय (२४ जुलै) वाचले. द्रौपदी मुर्मू यांच्या निवडीने सर्वसामान्य नागरिकाला सर्वोच्च घटनात्मक पदावर विराजमान करण्याची लोकशाहीची ताकद पुन्हा एकदा जगासमोर आली आहे. मात्र 'आदिवासी', 'महिला' यांसारखी विशेषणे लावून राष्ट्रपती मुर्मू यांच्या कार्यकर्तृत्वाचा परीघ बंदिस्त करू नये एवढीच सर्वांकडून माफक अपेक्षा!

यानिमित्ताने काही प्रश्नही मनात उभे राहतात. मुर्मू यांच्या निवडीने महिलांवरील अत्याचार कमी होणार आहेत का? विकासापासून हजारो कोस दूर असणाऱ्या आदिवासींच्या विकासाला आता तरी सुरुवात होणार आहे का? आदिवासी बांधवांच्या विकासाचा अनुशेष मुर्मू यांच्या राष्ट्रपतीकाळात भरून निघेल का? आजही रोजगारासाठी अनेक आदिवासी बांधवांना आपल्या कुटुंबकबिल्यासह शेकडो किलोमीटर स्थलांतर करावे लागते. त्यामुळे त्यांचे जीवन सदैव अस्थिर असते. वीटभट्टी उद्योग, खाणकाम, लागवड, ऊसतोड. वेठबिगारी असे अतिश्रमाचे व बेभरवशाचे उद्योग स्वातंत्र्याच्या ७५ वर्षांनंतरही फक्त त्यांच्याच वाटयाला का यावेत? स्वातंत्र्यानंतर आदिवासींच्या कल्याणासाठी राबवलेल्या सरकारी योजनांतून किती आदिवासी बांधवांचे 'कल्याण'(?) झाले याचा लेखाजोखा (ऑडिट) मुर्मू आपल्या राष्ट्रपती पदाच्या कार्यकाळात घेतील का? कोणाच्याही दबावाला बळी न पडता ३१ डिसेंबर २००७च्या आदिवासी वनहक्क कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करण्याचे धारिष्ट्य त्या दाखवतील का? कुपोषणामुळे एकाही आदिवासी बांधवाचा मृत्यू होऊच नये याचा आग्रह ते केंद्र सरकारकडे धरतील का? गुजरात राज्यातील नर्मदा सरोवर प्रकल्पग्रस्त आदिवासींचे अनेक वर्षे प्रलंबित प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी राष्ट्रपती या नात्याने विशेष लक्ष घालतील का? आदिवासी समाजाची वेठबिगारी संपून त्यांच्या आयुष्यात विकासाची नवी पहाट यावी अशी अपेक्षा यानिमित्ताने करावी का? या समाजातून मोठ्या संख्येने सनदी व प्रशासकीय अधिकारी तयार होतील इतके बळ त्या आदिवासींना देतील का? आदिवासी विकासाच्या नावाखाली चालणारी हिरवी कुरणे बंद करून निवारा, रस्ता, पाणी, वीज, आरोग्य, शिक्षण व रोजगार या मूलभूत सुविधा प्रत्येक आदिवासी पाड्यावर प्राधान्यक्रमाने पोहोचवण्यासाठी पुढाकार घेतील का?

या त्या भागांतील लोकांना याची सवयही होते आहे. त्यामुळेच जिव्हाळ्याचा विषय असूनही, पाण्याचा मुद्दा निवडणुकांत ऐरणीवर येत नाही.

आणखी किती बात्रा?

देशातील अत्यंत यशस्वी आणि वलयांकित क्रीडा प्रशासक निरदर बात्रा यांना काही दिवसांपूर्वी सर्व पदांचा त्याग करावा लागला.

आंतरराष्ट्रीय हॉकी संघटनेचे अध्यक्षपद, भारतीय ऑलिम्पिक समितीचे अध्यक्षपद आणि आंतरराष्ट्रीय ऑलिम्पिक संघटनेचे सदस्यत्व या पदांवर बात्रा कार्यरत होते. एकापेक्षा अधिक क्रीडा संघटनांच्या अधिकारीपदांवर चिकटून राहण्याची उदाहरणे भारतात बक्कळ आढळतात. त्या पातळीवर आपल्याकडे शिस्त, पारदर्शिता आणि शुचिता अजिबात दिसत नाही. क्रिकेटेतर खेळांमध्ये आणि विशेषत: ऑलिम्पिक, एशियाड आणि राष्ट्रकुलसारख्या बहुविध खेळांच्या स्पर्धामध्ये भारतीय क्रीडापटूंची कामगिरी दिवसागणिक सुधारत असल्यामुळे एकंदरीत बरे चित्र असल्याचे भासत असले तरी या संघटनांवरील राजकीय आणि कॉर्पोरेट धेंडांची पकड सुटण्याची चिन्हे नाहीत आणि त्यामुळे तळागाळात असीम गुणवत्ता असूनही आपण ऑस्ट्रेलिया, अमेरिका, ब्रिटन किंवा जर्मनीच्या स्तरावर पोहोचू शकत नाही. बात्रा यांनी हॉकी या

खेळाला जुने वैभव प्राप्त करून देण्यात मोठा वाटा उचलला हे काही माध्यमांचे मत. परंतु ते करताना ते हॉकी इंडियाचे आजीव सदस्य, अध्यक्ष वगैरे कसे काय राहू शकतात? तेथील संघटनात्मक निवडणुकांचे काय? एरवी राजकीय नेते लोकप्रतिनिधी म्हणून निवडून येण्यासाठी गुमान निवडणुकांना सामोरे जातात. परंतु एखाद्या क्रीडा संघटनेत पदाधिकारी झाल्यानंतर त्यांचे निवडणूकभान आणि लोकशाहीची जाण लुप्त होते. तीच बाब कॉर्पोरेट मंडळींबाबत. एरवी स्वत:ची कंपनी नियमानुरूप चालवून, वाढवून नावारूपाला आलेली कॉर्पोरेट क्षेत्रातली बरीचशी मंडळी क्रीडा संघटनेत दाखल झाल्यानंतर कॉर्पोरेट शिस्तीविषयी चकार शब्द काढत नाहीत. गेल्या काही वर्षांमध्ये विशेषत: देशातील न्यायालयांनी आणि आंतरराष्ट्रीय संघटना, लवादांनी देशातील अनेक क्रीडा संघटना चालकांच्या मनमानी कारभारावर ताशेरे ओढलेले आहेत. क्रिकेट, फुटबॉल संघटनांच्या निवडणुका आणि पदाधिग्रहणाबाबत नियम-चौकटी घालून दिल्या आहेत. वास्तविक हे काही न्यायव्यवस्थेचे काम नव्हे. बात्रा यांच्या बाबतीत उल्लेखनीय बाब म्हणजे, ते हॉकी इंडिया नामे देशात हॉकीचा कारभार हाकणाऱ्या संघटनेचे आजीव सदस्य होते. त्याच्या आधारे ते भारतीय ऑलिम्पिक संघटनेचे अध्यक्ष झाले. त्याच्या जोरावर ते आंतरराष्ट्रीय ऑलिम्पिक संघटनेचे सदस्यही बनले. २५ मे रोजी दिल्ली उच्च न्यायालयाने 'आजीव सदस्य' या संकल्पनेलाच आक्षेप घेतला. राष्ट्रीय क्रीडा संहितेच्या चौकटीत आजीव सदस्य, आजीव अध्यक्ष वगैरे संकल्पनांना स्थान नाही, असे न्यायालयाने नि:संदिग्धपणे सांगितल्यामुळे बात्रा यांचे सदस्यत्व आणि अध्यक्षपद रद्द झाले होते.

।। अभंगवाणी ।।



महारासि सिवे ।
कोपे ब्राम्हण तो नव्हे ।।१।।
तया प्रायश्चित्त कांहीं ।
देहत्याग करितां नाहीं ।।ध्रु.।।

- संत तुकाराम

महाईन्यूज हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

शॉर्ट न्यूज

शिवसेनेच्या माजी नगरसेविकेच्या पतीला लोखंडी सळीने बेदम मारहाण

। सांगली । महाईन्यूज ।

शिवसेनेच्या माजी नगरसेविकेच्या पतीला सोमवारी सकाळी सात जणांच्या टोळीने लोखंडी सळीने बेदम मारहाण केली. ही मारहाण राजकीय कारणातून झाल्याची चर्चा असून या प्रकरणी सागर मलगुंडे यांच्यासह सात जणाविरूध्द जीवे मारण्याचा प्रयत्न केल्याचा गुन्हा इस्लामपूर पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आला आहे. माजी नगरसेविका प्रतिभा शिंदे यांचे पती शिवकुमार शिंदे हे दुचाकीवरून दूध घेउन घरी जात असताना मंत्री कॉलनी ते हनुमान नगर रस्त्यावर शस्त्रासह आलेल्या जमावाने प्राणघातक हल्ला केला. यामध्ये ते गंभीर जखमी झाले. नागरिकांनी त्यांना तात्काळ उपजिल्हा रूग्णालयात उपचारासाठी दाखल केले. प्राथमिक उपचारानंतर त्यांना सांगलीतील भारती हॉस्पिटलमध्ये अतिदक्षता विभागात दाखल करण्यात आले आहे.मारहाण करणाऱ्यामध्ये मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या गटाचे जिल्हा प्रमुख आनंदराव पवार यांचे कार्यकर्ते मलगुंडे यांच्यासह सात जणांचा समावेश असून पोलीस हल्लेखोरांचा शोध घेत आहेत.

मंत्रीमंडळ विस्तारावरुन अजित पवारांची एकनाथ शिंदे-फडणवीस सरकारवर टीका!

राज्यात ओला दुष्काळ जाहीर करावा, अशी मागणी राज्याचे विरोधीपक्ष नेते अजित पवार यांनी केली

। मुंबई । महाईन्यूज ।

विधिमंडळ अधिवेशन आणि मंत्रीमंडळ विस्तारावरून राज्याचे विरोधीपक्ष नेते अजित पवार यांनी आज पत्रकार परिषद घेऊन शिंदे-फडणवीस सरकारवर जोरदार टीका केली आहे. राज्यात बहुमताचे सरकार असतानादेखील राज्यात मंत्रीमंडळ विस्तार का होत नाही? असा प्रश्न त्यांनी शिंदे-फडणीस सरकारला विचारला आहे. तसेच राज्यात ओला दुष्काळ जाहीर करावा, अशी मागणीही त्यांनी राज्य सरकारकडे केली आहे. काय म्हणाले अजित पवार? राज्यात बहुमताचे सरकार आहे. तरीही मंत्रिमंडळाचा विस्तार होत नाही, हा जनतेचा अपमान आहे, अशी टीका अजित पवार यांनी केली आहे. तसेच राज्यात बहुमताचे सरकार असताना अधिवेशन का घेतल्या जात नाही, अधिवेशन घ्यायला तुम्हाला कोणी अडवलं आहे? असा प्रश्नही त्यांनी शिंदे-फडणवीस सरकारला विचारला आहे. राज्यात सध्या अतिवृष्टी सुरू आहे. आमचे अनेक आमदार त्या भागात जाऊन पाहणी करत आहे. हे प्रश्न मांडण्यासाठी विधिमंडळ हे हक्काचे ठिकाण आहे. मात्र, अधिवेशन होत नसल्याने हे प्रश्न मांडायचे कुठे, असा प्रश्नही त्यांनी उपस्थित केला आहे. ओला दुष्काळ जाहीर करण्याची मागणी

राज्यात ओला दुष्काळ जाहीर करावा, अशी मागणी त्यांनी राज्य सरकराकडे केली आहे. यासंदर्भात त्यांनी राज्य सरकारला पत्रही लिहीले आहे. "राज्यात सध्या अतिवृष्टी सुरू आहे. कधी नव्हे ती यंदा जुलै महिन्यात धरणं भरली आहेत. विदर्भ, मराठावाड्यात अनेक शेतकऱ्यांचे नुकसान झाले आहे. त्यामुळे राज्यात ओला दुष्काळ जाहीर करा, असं ते म्हणाले. तसेच राष्ट्रपती निवडणुकीच्या दिवशी आम्ही मुख्यमंत्री उपमुख्यंत्री दोघांचीही भेट घेतली. तसेच या प्रकरणात तातडीने लक्ष घाला अशी विनंती केली. मात्र, अद्याप काहीही प्रयत्न सरकारकडून झाले नाहीत, असा आरोपही त्यांनी यावेळी केला.

"नेहमीच्या नियमांप्रमाणे मदत करुन चालणार नाही"

राज्यात ओला दुष्काळ जाहीर करा, अशी मागणी करत अजित पवार यांनी शेतकऱ्यांना नेहमीच्या नियमांप्रमाणे मदत करून चालणार नाही, असे म्हटले आहे. नियमांच्या पलिकडे जाऊन शेतकऱ्यांना मदत करावी लागेल, असे ते म्हणाले. निसर्ग असेल किंवा इतर वादळे असतील, यावेळी त्यावेळी एसडीआरएफचे नियम बाजुला ठेऊन महाविकास आघाडी सरकारने मदत केली होती. तशा पद्धतीने आताही मदत करणे गरजेचे आहे, असेही ते म्हणाले.

ओबीसी आरक्षणावरुन भाजपा टोला

ओबीसी आरक्षणाच्या श्रेयवादावरून अजित पवार यांनी भाजपाला खोचक टोला लगावला. ओबीसी आरक्षण आमच्यामुळेच मिळालं, असा आव आणण्याचा प्रयत्न काही राजकीय पक्ष करत आहे. मात्र, ही मागणी सर्वांची होती आणि यासाठी सर्वांनीच मदत केली, असे ते म्हणाले.

बंडखोर आमदार गुलाबराव पाटलांची आदित्य ठाकरेंवर बोचरी टीका!

गद्दारांनी राजीनामा देऊन पुन्हा निवडून यावं, असं आव्हानदेखील आदित्य ठाकरे करत आहेत

। सोलापूर । महाईन्यूज ।

शिवसेनेचे ज्येष्ठ नेते एकनाथ शिंदे यांच्यासह ४० आमदारांनी बंडखोरी केल्यामुळे शिवसेना पक्षाला मोठं खिंडार पडलं आहे. दरम्यान, शिवसेनेचे नेते आदित्य ठाकरे आक्रमक झाले आहेत. 'शिवसंवाद' यात्रेच्या माध्यामातून ते महाराष्ट्राचा दौरा करत आहेत. ज्या ठिकाणी जातील, तेथून आदित्य ठाकरे बंडखोर आमदारांवर टीकास्त्र सोडत आहेत. ते सातत्याने बंडखोर आमदारांचा उल्लेख 'गद्दार' असा करत आहेत. तसेच गद्दारांनी राजीनामा देऊन पुन्हा निवडून यावं, असं आव्हानदेखील आदित्य ठाकरे करत आहेत.

त्यामुळे आता बंडखोर आमदारांनीदेखील आदित्य ठाकरे यांच्याविरोधात बोलायला सुरुवात केली आहे. बंडखोर आमदार गुलाबराव पाटील यांनीही आदित्य ठाकरेंवर टीकास्त्र सोडलं आहे. 'एबीपी माझा' या वृत्तवाहिनीशी बोलताना पाटील म्हणाले, "आम्ही गद्दारी केलीच नाही. आम्ही शिवसेनेचे बेंच सोडून बाहेर बसलो नाही. आम्ही शिवसेनेसोबतच आहोत. त्यामुळे राजीनामा देण्याचा प्रश्नच येत येत नाही." आदित्य ठाकरेंच्या महाराष्ट्र दौऱ्याबद्दल गुलाबराव पाटील म्हणाले, "आदित्य ठाकरे आज महाराष्ट्र दौऱ्यासाठी बाहेर का पडले आहेत? गेल्या अडीच वर्षात ते कधीही शिवसेना भवनाची पायरी चढले नाहीत. आताच पळापळ का करत आहेत? यापूर्वी आमचंदेखील हेच म्हणणं होतं की तुम्ही बाहेर पडलं पाहिजे. तुम्ही ३० वर्षाचे तरुण आहात. उद्धव ठाकरे यांची प्रकृती खराब असली किंवा करोनाचा काळ असला, तरी आता जसं राज्यभर पायाला भिंगरी लावून फिरताय, तसंच फिरा असं आमचं म्हणणं होतं."

"८० वर्षाचे शरद पवार तीन-तीन वेळा जळगाव जिल्ह्यात येतात. अजित पवार आणि धनंजय मुंडे हेही जळगाव जिल्ह्याचे दौरे करतात, पण आदित्य ठाकरे बाहेर पडत नाहीत, हे मी सभागृहात देखील मांडलं होतं" अशी टीकाही गुलाबराव पाटलांनी केली आहे.

"गद्दारांनी राजीनामा देऊन पुन्हा निवडून यावं" या आदित्य ठाकरेंच्या टीकेला प्रत्युत्तर देताना पाटील म्हणाले, "आम्ही राजीनामा देण्याचा संबंध येतोच कुठे? आम्हाला लोकांनी धनुष्यबाणावर निवडून दिलं आहे.

धनुष्यबाण हा शिवसेनेचा आहे. ती शिवसेना वाचवण्याचा प्रयत्न आम्ही करतोय, त्यामुळे राजीनामा देण्याचा संबंध येतोच कुठे?" असंही त्यांनी म्हटलं आहे. दरम्यान, मंत्रीमंडळ विस्तार कधी होईल? असा प्रश्न विचारला असतान गुलाबराव पाटील म्हणाले, "मंत्रीमंडळ विस्तार कधी होईल? याचा कधी विचारच केला नाही. जो व्यक्ती मंत्रीपद सोडून आलाय, तो कशाला अशा गोष्टींचा विचार करेन? ८ मंत्र्यांनी राजीनामा देण्याची ही देशातील पहिलीच घटना आहे. लोकं सत्तेकडे जातात आम्ही सत्तेतून बाहेर पडलोय, मंत्रीपदं आमच्याकडे होती. लोकं साधं सरपंचपददेखील सोडत नाहीत. आम्ही कॅबिनेट मंत्रीपद आणि पालकमंत्रीपद सोडलंय, याचाच अर्थ आम्हाला आमचा धनुष्यबाण वाचवायचा होता. शिवसेना वाचवायची होती, त्यामुळे मंत्रीपद कधी येईल? किंवा न्यायालयात काय निर्णय लागेल, याच्याशी आम्हाला काही देणं-घेणं नाहीये, आम्हाला शिवसेना वाचवायची आहे" असं स्पष्टीकरण गुलाबराव पाटलांनी दिलं आहे.

शॉर्ट न्यूज »

गुजरातमध्ये विषारी दारूचे 8 बळी

।नवी दिल्ली। महाईन्यूज । प्रतिनिधी।

गुजरातमधील बोताड जिल्ह्यात सोमवारी विषारी दारूचे सेवन केल्याने 8 जणांचा मृत्यू झाला. या प्रकरणी 18 जण आजारी असून, त्यापैकी 5 जणांची प्रकृती गंभीर आहे. त्यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. सोमवारी सकाळी दोघांची प्राणज्योत मालवली. तर उपचारादरम्यान 6 जणांचा मृत्यू झाला. बोताड पोलिसांच्या माहितीनुसार, विषारी दारूला बळी पडलेल्या सर्वांनी रविवारी त्री रोजिदलगतच्या नभोई गावात जाऊन मद्यपान केले होते. सोमवारी सकाळी सर्वांना पोटदुखी व उलट्यांचा त्रास सुरू झाला. त्यानंतर काही वेळातच दोघांचा मृत्यू झाला. तर रुग्णालयात उपचारादरम्यान आणखी 6 जणांचा काही वेळाच्या अंतराने मृत्यू झाला.

ठाकरे विरुद्ध शिंदे !

निवडणूक आयोगाने शिवसेनेसंदर्भात दिलेल्या निर्देशांविरोधात उद्धव ठाकरे गट सर्वोच्च न्यायालयात

।नवी दिल्ली । महाईन्यूज । प्रतिनिधी।

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वातील शिवसेनेच्या बंडखोर गटाने शिवसेना पक्षावरील आपला दावा सादर करत थेट निवडणूक आयोगाकडे मागणी केली. यानंतर निवडणूक आयोगानेही कार्यवाही सुरू करत दोन्ही गटांना शिवसेनेवरील दाव्याबाबत कागदपत्रे सादर करण्याचे निर्देश दिले. आता शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या गटाने शिंदे गटाच्या याच मागणीविरोधात मोठं पाऊल उचललं आहे. ठाकरे गटाने शिंदे गटाच्या या मागणविरोधात थेट सर्वोच्च न्यायालयाचे दरवाजे ठोठावले आहेत.

ठाकरे गटाने सर्वोच्च न्यायालयात आणखी एक याचिका सादर केली आहे. या याचिकेत ठाकरे गटाने एकनाथ शिंदे गटाच्या मागणीवरून निवडणूक आयोगाने सुरू केलेल्या कार्यवाहीला स्थगिती देण्याची मागणी केलीय.

शिंदे गटाचे निवडणूक आयोगाला पत्र

याबाबत शिंदे गटाने निवडणूक आयोगाला पत्र पाठवत आपल्याच गटाला शिवसेना पक्ष म्हणून मान्यता देण्यात यावी, अशी मागणी केली होती. आधी सर्वोच्च न्यायालयात याबाबत लढाई सुरु होती आता हा वाद निवडणूक आयोगापर्यंत पोहचला आहे. निवडणूक आयोग दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेऊन आपला निर्णय जाहीर करेलं. यासाठी दोन्ही बाजूच्या गटांना ८ ऑगस्टपर्यंत कागदोपत्री पुरावे सादर करण्याचे निर्देश दिले आहेत. त्यामुळे शिवसेना खरी कोणाची या वादाचा निकाल लवकरच लागण्याची शक्यता आहे.

या प्रकरणातील याचिका सर्वोच्च न्यायालयासमोर प्रलंबित आहेत. त्यामुळे निवडणूक आयोग यावर कार्यवाही करू शकत नाही, असा युक्तिवाद ठाकरे गटाच्या याचिकेत करण्यात आला आहे.

एकनाथ शिंदे गटाने शिवसेना पक्षावर दावा केल्यानंतर निवडणूक आयोगाने उद्धव ठाकरे आणि शिंदे गटाला बहुमताचा कागदोपत्री पुरावे सादर करण्याचा निर्देश दिला आहे. यासाठी ८ ऑगस्टपर्यंतची मुदत देण्यात आली आहे. दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकल्यानंतर निवडणूक आयोग सुनावणी करणार आहे. शिवसेनेचे निवडणूक चिन्ह धनुष्यबाणही कोणाकडे राहणार याबाबतही ८ ऑगस्टला फैसला होणार आहे. धनुष्यबाणावरही शिंदे गटाचा दावा एकनाथ शिंदेंसोबत शिवसेनेच्या ४० पेक्षा जास्त आमदारांनी बंड केल्यानंतर पक्षात मोठी फूट पडली होती. बंडानंतर शिंदे गटाने भाजपासोबत युती करत सत्ता स्थापन केली. एकनाथ शिंदेंनी मुख्यमंत्री तर देवेंद्र फडणवीस यांनी उपमुख्यमंत्री पदाची शपथ घेतली. त्यानंतर शिंदे गटावर कारवाई करत शिवसेनेने सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली आहे. तर दुसरीकडे शिंदे गटाने खरी शिवसेना आमचीच असल्याचा दावा केला आहे. तसेच शिवसेनेचे चिन्ह धनुष्यबाणावरही शिंदे गटाकडून हक्क सांगण्यात आला आहे.

झारखंडमध्ये मिथेन वायूची गळती!

वीज पडताच बोअरवेलमधून पाण्याबरोबर आगीचे लोट, नागरिकात घबराट

।नवी दिल्ली । महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

बोअरवेलच्या पाईपमधून अचानक पाण्याबरोबरच आगीचे लोळ बाहेर पडू लागले. त्यामुळे उपस्थितांना आश्चर्याचा धक्काच बसला. ही घटना झारखंड राज्यातील रामगड परिसरात शनिवारी घडली. नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

या सर्वामागे मिथेन वायू गळती होत असल्याचे प्रामुख्याने सांगीतले जात आहे. तर मिथेन गळतीमुळे पक्ष्यांचा मृत्यू झाल्याने नागरिकांत भीती निर्माण झाली आहे.

जिल्ह्यातील मांडू ब्लॉकमधील कोठीतांड आणि के-लायो करमाली टोलजवळ वायू गळती झाली. विशेष बाब म्हणजे शनिवारी झालेला जोरदार पाऊस आणि विज कोसळल्याने तसेच वादळामुळे जमीनीतून निघणा-या मिथेन वायूला आग लागली आहे. या संपूर्ण घटनेने पंचक्रोशीतील गावांमध्ये खळबळ उडालेली आहे. याबाबत स्थानिकांनी झारखंडच्या सीसीएलच्या प्रकल्पाशी संबंधित अधिकऱ्यांना माहिती दिलेली आहे.

दहा हजार लोक बाधित

गॅसगळतीमुळे दहा हजारांहून अधिक लोकसंख्या बाधित होत आहे. त्यांनी सांगितले की, एकीकडे सर्वसामान्य जनता यामुळे चिंतेत आहे, तर दुसरीकडे शेतात जाण्यास लोक घाबरू लागली आहे. झारखंडच्या धनबाद, रामगड आणि बोकारोमध्ये सुमारे 16 लाख घनमीटर मिथेन वायूचे साठे सापडले आहेत.

स्थानिक सीसीएलवर नाराज

शनिवारी देखील पावसादरम्यान वादळी वाऱ्यामुळे करमाळी टोल जवळील बोअर होल मधून निघणाऱ्या मिथेन वायूला आग लागली. त्यामुळे बोअरच्या पाईपमधून पाण्याबरोबरच आग बाहेर पडू लागली. याबाबत स्थानिकांनी सांगीतले की, सीसीएल व्यवस्थापन प्रत्येकी वेळी आग विझवून आपली जबाबदारी टाळते. यावेळीही तसेच घडले आहे. काही प्रयत्नानंतर जमीनीतून बाहेर पडणारी आग विझविण्यात आली.

LAC वर चीनची भारताला चिथावणी

पूर्व लडाखमध्ये चिनी लढाऊ विमानांचे उड्डाण

।नवी दिल्ली ।महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

कॉर्प्स कमांडर स्तरावरील चर्चेच्या अनेक फेऱ्यांनंतरही चीन आपल्या कारवाया थांबवत नसल्याचे पाहायला मिळत आहे. चीनची लढाऊ विमाने पूर्व लडाखमध्ये भारतीय सैन्याला चिथावणी देण्याचा प्रयत्न करत आहेत. गेल्या तीन ते चार आठवड्यांपासून चीनची लढाऊ विमाने नियमितपणे LACच्या जवळून उड्डाण करत आहेत. त्याचबरोबर भारतीय हवाई दलाचे जवानही चीनच्या प्रत्येक हालचालीवर बारीक लक्ष ठेवून आहेत. भारतीय हवाई दलही चीनच्या या खेळीला चोख प्रत्युत्तर देत आहे. यासोबतच या प्रकरणात कोणताही धोका निर्माण होऊ नये यासाठी हवाई दल सतर्क झाले आहे. मीडिया रिपोर्ट्समध्ये सरकारी सूत्रांचा हवाला देत चीनच्या J-11 सह अनेक लढाऊ विमाने LAC जवळ उड्डाण करत असल्याचे सांगण्यात आले. त्याचवेळी, अलीकडेच यामध्ये 10 किमीच्या कॉन्फिडन्स बिल्डिंग मेजर लाइनचे उल्लंघन केल्याचे प्रकरण देखील समोर आले आहे. याचे प्रत्युत्तर म्हणून, भारतीय हवाई दलाने मिग-29 आणि मिराज 2000 सह सर्वात शक्तिशाली लढाऊ विमाने विकसित तळांवर तैनात केली.

अमोल कोल्हेंच्या ऐतिहासिक चित्रपटातील गाण्याला प्रसिद्ध बॉलिवूड गायकाचा आवाज

डॉ. अमोल कोल्हे यांच्या 'गरुडझेप' या ऐतिहासिक चित्रपटामधील पहिलं गाणं प्रदर्शित झालं आहे. मराठीमध्ये एकापोठापाठ एक ऐतिहासिक चित्रपट प्रदर्शित होत आहेत. ऐतिहासिक चित्रपटांकडे प्रेक्षकांचा ओढा देखील वाढला आहे. अशामध्येच आता अभिनेते डॉ. अमोल कोल्हे (AMOL KOLHE) यांनी नव्या ऐतिहासिक चित्रपटाची घोषणा केली आहे. 'गरुडझेप' असं या चित्रपटाचं नाव आहे. चित्रपटाचा टीझर पाहून प्रेक्षकांमध्ये 'गरुडझेप' बाबत उत्सुकता आणखीनच वाढली आहे. आता या चित्रपटामधील पहिलं गाणं प्रदर्शित झालं आहे.

अमोल कोल्हे यांनी त्यांच्या इन्स्टाग्राम अकाऊंटद्वारे याबाबत माहिती दिली. 'बम बम भोले' असं या चित्रपटामधील गाण्याचं नाव आहे. या गाण्यामध्ये अमोल कोल्हे यांची झलक पाहायला मिळत आहे. तसेच चित्रपटाची उत्सुकता वाढवणाऱ्या या गाण्याला प्रेक्षकांची पसंती मिळताना दिसत आहे. या गाण्यामधील अमोल कोल्हे यांचा लूक विशेष लक्षवेधी ठरत आहे. "वेरूळच्या घृष्णेश्वराला, रायगडच्या जगदीश्वराला नमन करून आपल्या 'शिवप्रताप – गरुडझेप' चित्रपटामधील पहिलं गाणं खास आपल्यासाठी" असं अमोल कोल्हे यांनी गाणं शेअर करताना म्हटलं आहे. या गाण्याची खासियत म्हणजे सुप्रसिद्ध गायक कैलाश खेर यांनी हे गाणं गायलं आहे. तर शशांक पोवार यांनी या गाण्याला संगीत दिलं आहे. "वेरूळच्या घृष्णेश्वराला, रायगडच्या जगदीश्वराला नमन करून आपल्या 'शिवप्रताप – गरुडझेप' चित्रपटामधील पहिलं गाणं खास आपल्यासाठी" असं अमोल कोल्हे यांनी गाणं शेअर करताना म्हटलं आहे. या गाण्याची खासियत म्हणजे सुप्रसिद्ध गायक कैलाश खेर यांनी हे गाणं गायलं आहे. तर शशांक पोवार यांनी या गाण्याला संगीत दिलं आहे.

"करिश्मा कपूरमुळे अक्षय खन्ना अद्यापही आहे अविवाहित

एकेकाळी अक्षयचे अनेक चित्रपट गाजले. मात्र, कालांतराने त्याची क्रेझ कमी होऊ लागली. इतकंच नाही तर आता त्याचा कलाविश्वातील वावरही कमी झाला आहे. परंतु, अनेकदा त्याची सोशल मीडियावर चर्चा होताना दिसून येते. अक्षय अद्यापही अविवाहित असून त्याच्या सिंगल राहण्यामागे अभिनेत्री करिश्मा कपूर जबाबदार असल्याचं म्हटलं जातं. एका मुलाखतीत याविषयी त्याने भाष्यदेखील केलं होतं. बॉर्डर या चित्रपटामुळे अक्षयला खऱ्या अर्थाने ओळख मिळाली. या चित्रपटानंतर त्याने अनेक गाजलेल्या चित्रपटांमध्ये काम केलं. त्यात आ अब लौट चलें;ताल;दिल चाहता है;हलचलगांधी माय फादर ; हमराज आणि हंगामा यांसारख्या चित्रपटांचा समावेश आहे. फिल्मी करिअरसोबतच अक्षयचं पर्सनल लाइफही चर्चेत राहिलं. वयाची ४५ वर्ष पार केल्यानंतरही अक्षय अद्यापही अविवाहित आहेत. त्यामुळेच त्याने लग्न का केलं नाही असा प्रश्न नेटकऱ्यांना पडतो. एकेकाळी अक्षय आणि करिश्मा कपूर यांच्या रिलेशनची कलाविश्वात प्रचंड चर्चा रंगली होती. इतकंच नाही तर ही जोडी लग्नदेखील करणार होती. मात्र, करिश्मा कपूरच्या आईमुळे हे लग्न होता होता राहिलं. त्यानंतर अक्षयने कोणत्याही मुलीसोबत पुन्हा लग्न करण्याचा विचार डोक्यातून काढून टाकला.अक्षय आणि करिश्माचं लग्न व्हावं यासाठी अभिनेता रणधीर कपूर स्वत: विनोद खन्ना यांच्या घरी गेले होते. या दोघांनी आपल्या मुलांचं लग्नदेखील ठरवलं होतं. मात्र, या लग्नामुळे करिश्माची आई बबिता खूश नव्हती. त्यांनी या लग्नाला विरोध केला.करिश्मा-अक्षयच्या लग्नाची बोलणी सुरु असताना त्याच काळात करिश्माच्या फिल्मी करिअरने चांगलाच जोर धरला होता. त्यामुळे लग्नामुळे आपल्या मुलीच्या करिअरवर परिणाम होऊ नये यासाठी त्यांनी या लग्नाला विरोध केला.

कतरिना कैफ आणि विकी कौशलला जीवे मारण्याची धमकी

अभिनेत्री कतरिना कैफ आणि तिचा पती अभिनेता विकी कौशलला जीवे मारण्याची धमकी देणाऱ्या आरोपीला सांताक्रूझ पोलिसांनी अटक केली आहे. मनविंदर सिंह, असे त्या आरोपीचे नाव असून तो मूळचा उत्तप्रदेशमधील लखनऊचा रहिवासी आहे. मनविंदरने सोशल मीडियाच्या माध्यमातून विकी कौशल आणि कतरिना कैफला जीवे मारण्याची धमकी दिली होती. या घटनेनंतर विकी कौशलने आरोपीविरोधात सांताक्रूझ पोलीस स्थानकात गुन्हा दाखल केला होता. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार मनविंदर सिंह हा छोट्या मोठ्या चित्रपट आणि मालिकांमध्ये काम करणारा अभिनेता आहे. आपण कतरिनाचा चाहता असल्याचा दावा त्याने केला आहे. तो कतरिना कैफला सोशल मीडियावर स्टॉक देखील करत होता. सांताक्रूझ पोलिसांनी भारतीय दंड संहिता कलम ५०६-II (गुन्हेगारी धमकावणे) आणि ३५४-डी (पीछे मारणे) अंतर्गत मनविंदरविरोधात एआयआर दाखल केली आहे. तसेच पोलिसांनी आयटी ॲक्टनुसार गुन्हा दाखल केला आहे.

'आई कुठे काय करते' मधील अनिरुद्धची खरी लेक

अभिनेता मिलिंद गवळीने आपल्या लेकीचा एक खास व्हिडीओ इन्स्टाग्राम अकाऊंटद्वारे शेअर केला आहे. छोट्या पडद्यावरील 'आई कुठे काय करते' ही मालिका लोकप्रिय मालिकांपैकी एक आहे. या मालिकेमधील कलाकार मंडळींनी तर प्रेक्षकांच्या मनावर अधिराज्य गाजवलं आहे. मालिकेमध्ये अनिरुद्धची भूमिका साकारणारा अभिनेता मिलिंद गवळीचा तर एक वेगळाच चाहतावर्ग आहे. सोशल मीडियावर सतत सक्रिय असणाऱ्या मिलिंदचे इन्स्टाग्रामवर लाखोच्या घरात चाहते आहेत. मालिकेमध्ये कधी कठोर तर कधी नकारात्मक भूमिकेमध्ये दिसणारा मिलिंद खऱ्या आयुष्यामध्ये फारच वेगळा आहे. त्याचं त्याच्या मुलीवर विशेष प्रेम आहे. त्याने आपल्या लेकीचा एक व्हिडीओ इन्स्टाग्राम अकाऊंटद्वारे शेअर केला आहे. मिलिंदने त्याची मुलगी मिथिला कोणत्या क्षेत्रात कार्यरत आहे? आपल्याला तिचा का अभिमान आहे? याबाबत एक खास पोस्ट शेअर केली आहे. मिथिलाचा व्हिडीओ शेअर करत त्याने म्हटलं की, "फिटनेस ट्रेनर म्हणून काम करायचं मिथिलाने ठरवलं. या क्षेत्रामध्ये तिला काम करताना पाहून वडील म्हणून मला मिथिलाचा अभिमान वाटतो. जेव्हा तिने हे क्षेत्र निवडलं तेव्हा मी आश्चर्यचकीत झालो होतो.

"'काशीबाई बाजीराव बल्लाळ' मालिकेतील कलाकारांनी लुटला पावसाचा आनंद"

"'काशीबाई बाजीराव बल्लाळ' या ऐतिहासिक मालिकेचे शूटिंग सध्या कर्जतला सुरु आहे. मालिकेचे शूट सांभाळून सध्या कलाकार मजा मस्तीदेखील करताना दिसतात. शूट संपल्यानंतर मालिकेचे कलाकार पावसाळ्यात कर्जतच्या आजूबाजूच्या परिसरात फेरफटका मारतात.पावसाळ्यात कर्जत हे पर्यटनासाठी एक उत्तम स्थळ आहे. कारण आजूबाजूला भरपूर हिरवाईने नटलेला निसर्ग, खळाळते धबधबे आणि खोल दऱ्यांचे दर्शन घेताना भान हरपून जाते. या मालिकेचे चित्रण कर्जतच्या परिसरात केले जात असून मालिकेतील कलाकार हे पावसात ट्रेकिंगला जाताना आणि निसर्गाची मजा लुटताना दिसत आहेत. रोहित चंदेल म्हणाला, "कर्जतमध्ये 44 अंश डिग्रीचं तापमान सहन केल्यावर आता धमाल करण्याची संधी आली आहे. आम्ही सध्या पावसाळ्याचा मनसोक्त आनंद लुटत आहोत. कर्जतमध्ये चित्रीकरण करण्याचा सर्वात मोठा फायदा हाच आहे की तुम्हाला पावसात मजा करण्यासाठी दुसरीकडे कुठं जावं लागत नाही. मुंबईतले लोक रजा काढून कर्जत-लोणावळ्याला पावसाची मजा अनुभवायला येतात. पण पावसाचा आनंद लुटण्यासाठी आम्हाला रजा काढण्याची गरज नाही. चित्रीकरण संपल्यावर किंवा सकाळी लवकर उठून आम्ही आसपासच्या डोंगरांवर लाँग ड्राइव्हवर जातो. आम्हाला काही सुंदर धबधबेही सापडले आहेत. पण यातील सर्वात उत्तम भाग म्हणजे इथे मिळणारे चमचमीत, स्वादिष्ट पदार्थ. काही आठवड्यांपूर्वी इथे प्रचंड पाऊस पडत होता, तेव्ही सर्वांनी हायवेवर चालत फिरण्याचा निर्णय घेतला. वाटेत आम्ही रस्त्यालगतच्या एका टपरीवर थांबलो आणि गरम भजी आणि वाफाळत्या चहाचा आस्वाद घेतला. मी आजवर खाल्लेल्या सर्वात चवदार पदार्थांमध्ये त्याचा समावेश करीन. असे अनुभव मी जन्मात विसरणार नाही आणि ते माझ्या मनात कायमचे राहतील."काशीबाई बाजीराव बल्लाळचे कलाकार सध्या पावसाचा आनंद लुटत आहेत."

शॉर्ट न्यूज »

बुद्धिबळ ऑलिम्पियाडमध्ये यजमान भारताला अव्वल तीन स्थानांची संधी

चेन्नई । महाईन्यूज

आगामी ४४व्या बुद्धिबळ ऑलिम्पियाड स्पर्धेत भारताला अव्वल तीन स्थानांची नामी संधी आहे, असे मत महिला 'अ' संघाचा प्रशिक्षक श्याम सुंदरने व्यक्त केले. यजमान या नात्याने भारताला या स्पर्धेतील महिला विभागात दोन, तर खुल्या विभागात तीन संघ खेळवता येणार आहे. भारताच्या महिला 'अ' संघाला अव्वल मानांकन लाभले असून या संघात कोनेरू हम्पी, द्रोणावल्ली हरिका, आर. वैशाली, तानिया सचदेव आणि भक्ती कुलकर्णी यांचा समावेश आहे. ग्रँडमास्टर श्याम सुंदर या संघाला मार्गदर्शन करणार आहे. तसेच अन्य संघांतही नामांकित खेळाडूंचा समावेश आहे. "भारताच्या बहुतांश खेळाडूंच्या गाठीशी खूप अनुभव आहे. हे खेळाडू प्रदीर्घ काळापासून सर्वोच्च स्तरावर बुद्धिबळ खेळत आहेत. त्यामुळे ऑलिम्पियाडमध्ये भारताला अव्वल तीन स्थानांची नामी संधी आहे. आमच्या संघांनी कसून सराव केलेला आहे," असे श्याम सुंदर म्हणाला.

रोमहर्षक लढतीत भारताची विंडीजवर मात!

अक्षर पटेलची निर्णायक खेळी

।नवी दिल्ली। महाईन्यूज ।

भारत आणि वेस्ट इंडीज दरम्यान तीन सामन्यांची एकदिवसीय क्रिकेट मालिका खेळवली जात आहे. या मालिकेतील दुसरा सामना रविवारी (२४ जुलै) पोर्ट ऑफ स्पेनमधील क्वीन्स पार्क ओव्हल मैदानावरती झाला. या अटीतटीच्या सामन्यात भारताने वेस्ट इंडीजचा दोन गडी राखून पराभव केला. त्यामुळे तीन सामन्यांच्या मालिकेत भारताने २-० अशी विजयी आघाडी घेतली आहे. वेस्ट इंडिजचा कर्णधार निकोलस पूरनने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला होता. शाय होपच्या शतकाच्या बळावर वेस्ट इंडिजने निर्धारित ५० षटकांत सहा गडी गमावून ३११ धावा केल्या. हे लक्ष्य पार करण्यासाठी आलेल्या भारतीय संघाने सावध सुरुवात केली होती. शिखर धवन आणि शुबमन गिल यांनी पहिल्या गड्यासाठी ४८ धावा जोडल्या. पण, त्यानंतर ७९ धावांपर्यंत पोहोचण्याआधीच भारताने आपले तीन गडी गमावले. त्यानंतर श्रेयस अय्यर (६३) आणि संजू सॅमसन (५४) यांच्यातील ९९ धावांच्या भागीदारीने सामना भारताच्या बाजूने वळवला. दोघांनी अर्धशतकी खेळी केल्या. ते दोघे बाद झाल्यानंतर भारत पराभवाच्या छायेत आला होता. मात्र, दीपक हुडा आणि अक्षर पटेलने लक्ष्याचा पाठलाग सुरू ठेवला. अक्षर पटेलने जबरदस्त निर्णायक खेळी करून सामना शेवटच्या षटकापर्यंत खेचला.

भारताला विजयासाठी शेवटच्या षटकामध्ये ८ धावांची आवश्यकता होती. पटेलने शेवटच्या षटकातील चौथ्या चेंडूवर षटकार खेचून भारताला विजय मिळवून दिला. या दरम्यान त्याने आपल्या एकदिवसीय कारकिर्दीतील पहिले अर्धशतक पूर्ण केले. त्याने ३५ चेंडूत तीन चौकार आणि पाच षटकारांच्या मदतीने नाबाद ६४ धावा केल्या.

भारत-वेस्ट इंडिज एकदिवसीय मालिका

शे होपचे दिमाखदार शतक

भारताविरुद्ध दुसऱ्या सामन्यात विंडीजच्या 311 धावा

।पोर्ट ऑफ स्पेन । महाईन्यूज ।

सलामीवीर शे होपने (११५ धावा) साकारलेल्या शतकामुळे यजमान वेस्ट इंडिजने रविवारी भारताविरुद्धच्या दुसऱ्या एकदिवसीय क्रिकेट सामन्यात प्रथम फलंदाजी करताना ६ बाद ३११ अशी भक्कम धावसंख्या उभारली. धावांचा पाठलाग करताना पहिला सामना गमावणाऱ्या विंडीजने दुसऱ्या सामन्यात नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजीचा निर्णय घेतला. एकदिवसीय कारकीर्दीतील १००वा सामना खेळणारा होप आणि कायले मेयर्स (२३ चेंडूत ३९) यांनी ९.१ षटकांतच ६५ धावांची सलामी दिली. मेयर्सला फिरकीपटू दीपक हुडाने माघारी पाठवले. मग होपला शमार ब्रूक्स (३६ चेंडूत ३५) आणि कर्णधार निकोलस पूरन (७७ चेंडूत ७४) यांनी तोलामोलाची साथ लाभली. होपने १३५ चेंडूत आठ चौकार आणि तीन षटकारांच्या साहाय्याने ११५ धावा केल्या. हे त्याचे एकदिवसीय कारकीर्दीतील १३वे, तर भारताविरुद्धचे चौथे शतक होते. भारताकडून शार्दूल ठाकूर (३/५४), अक्षर पटेल (१/४०), हुडा (१/४२) आणि यजुर्वेंद्र चहल (१/६९) यांनी बळी मिळवले. वेस्ट इंडिजविरुद्धच्या पहिल्या एकदिवसीय सामन्यात षटकांची गती धिमी राखल्यामुळे भारताला दंड ठोठावण्यात आला आहे. खेळाडूंच्या सामन्याच्या मानधनापैकी २० टक्के रकमेचा हा दंड आहे.

महाईन्यूज
जाहिरात आणि बातम्यांसाठी संपर्क
708 309 8763

महाईन्यूज नोंद असूद्या..
महाईन्यूजची डिजीटल आवृत्ती छपाईसाठी नाही